महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ११९ वे | दिनांक : २४/०४/२०२६ | वार शुक्रवार

## बंगालमध्ये मतदानाचा नवा विक्रम, पहिल्या टप्प्यात ९१% मतदान

**चेन्नई :** गुरुवारी पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत विक्रमी मतदान झाले. बंगालमध्ये 294 पैकी 152 जागांवर पहिल्या टप्प्यातील मतदानात 91.46% मतदानाची नोंद झाली. तामिळनाडूमध्ये सर्व 234 जागांवर विक्रमी 84.41% मतदान झाले.

दोन्ही राज्यांच्या इतिहासातील हे सर्वाधिक मतदान आहे. निवडणूक आयोगाची आकडेवारी सायंकाळी 7 वाजेपर्यंतची असून त्यात बदल होण्याची शक्यता आहे. मतदानानंतर ममता बॅनर्जी म्हणाल्या, "बंगालच्या जनतेने एसआयआरच्या विरोधात प्रचंड बहुमताने मतदान केले आहे." गृहमंत्री शाह म्हणाले की, टीएमसीचा सूर्य मावळला आहे.

यापूर्वी, 9 एप्रिल रोजी आसाम, केरळ आणि पुदुचेरीमध्येही विक्रमी मतदान झाले होते. आसाममध्ये 85.91% सह इतिहासातील सर्वाधिक मतदानाची नोंद झाली, पुदुचेरीमध्ये 90% आणि केरळमध्ये 1987 नंतरचे सर्वाधिक 78.27% मतदानाची नोंद झाली. पाचही राज्यांमधील विधानसभा निवडणुकांचे निकाल 4 मे रोजी एकाच वेळी जाहीर केले जातील.


पश्चिम बंगालमधील दक्षिण मिदनापूर येथील कुमारगंज मतदारसंघातील भाजपचे उमेदवार सुवेंदू सरकार यांच्यावर हल्ला झाला. एका व्हिडिओमध्ये सुवेंदू आपल्या सुरक्षा रक्षकासह हल्ल्यातून वाचण्यासाठी पळताना दिसत आहेत. असे असूनही, जमाव त्यांना मारहाण करतच राहिला. दरम्यान, बर्नपूरच्या रहमतनगर परिसरात आसनसोल दक्षिण मतदारसंघातील भाजपच्या उमेदवार अग्निमित्रा पॉल यांच्या गाडीवरही हल्ला झाला. गाडीची मागची काच फोडण्यात आली. अग्निमित्रा यांनी सांगितले की, मतदान केंद्रातून बाहेर पडत असताना त्यांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आली. अग्निमित्रा यांनी हिरापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. बंगालमधील इतर अनेक ठिकाणी भाजप आणि टीएमसी कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष झाल्याचे वृत्त आहे. अनेक ठिकाणी इव्हीएममध्ये बिघाड झाल्याचेही वृत्त आहे.

बीरभूमच्या बोधपूर गावात इव्हीएममध्ये बिघाड झाल्याने लोकांनी पोलिस आणि केंद्रीय दलांवर दगडफेक केली. पोलिसांच्या एका वाहनाचीही तोडफोड करण्यात आली. या घटनेत अनेक सुरक्षा कर्मचारी जखमी झाले.

बुधवारी रात्री उशिरा मुर्शिदाबादच्या नौदामध्ये मतदान सुरू होण्यापूर्वी एक क्रूड बॉम्ब फेकला गेला. यात अनेक जण जखमी झाले. यानंतर, आम जनता उन्नयन पार्टीचे (एजेयूपी) प्रमुख हुमायूं कबीर सकाळी घटनास्थळी पोहोचले आणि त्यांना विरोधाचा सामना करावा लागला. त्यांचा टीएमसी कार्यकर्त्यांशी संघर्षही झाला.

त्यानंतर त्यांनी धरणे आंदोलन केले. दैनिक भास्करशी बोलताना ते म्हणाले, "पोलिस टीएमसी कार्यकर्त्यांविरुद्ध गुंडगिरीचा वापर करत आहेत. आमच्या समर्थकांना मारहाण केली जात आहे." नौदा घटनेप्रकरणी पोलिसांनी एफआयआर दाखल केला असून दोन जणांना अटक केली आहे.

## जब नाश मनुज पर छाता है, पहले विवेक मर जाता है



**जळगाव :** कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाच्या शीर्षकावरून नवा वाद उफाळून आला असून बुलढाण्याचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी यावर तीव्र आक्षेप नोंदवला आहे. हे शीर्षक छत्रपती शिवाजी महाराजांचा अनादर करणारे असल्याचा दावा करत गायकवाड यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोनवरून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ व धमकी दिल्याची तक्रार समोर आली आहे. या कथित संवादाची एक ऑडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, त्यातील भाषेमुळे सर्वच स्तरांतून संताप व्यक्त केला जात आहे.

आमदार संजय गायकवाड यांच्या या वर्तणुकीवर राजकीय वर्तुळातून कडक टीका होत असून, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी त्यांना चांगलेच खडे बोल सुनावले आहेत. एका जबाबदार लोकप्रतिनिधीने लेखकाच्या किंवा प्रकाशकाच्या कामाबद्दल आक्षेप घेताना अशा प्रकारे अश्लील भाषेचा वापर करणे आणि धमकावणे अशोभनीय असल्याचे सांगत खडसे यांनी त्यांचा निषेध केला आहे.

रोहिणी खडसे यांनी ट्विट करत म्हटले की, "जब नाश मनुज पर छाता है, पहले विवेक मर जाता है". हिंदीतील ही प्रसिद्ध कविता आमदार संजय गायकवाड यांना तंतोतंत लागू पडते. कधी गरीब कर्मचाऱ्यांना मारहाण करतात तर काही विचित्र आणि वादग्रस्त वक्तव्य करून प्रसिद्धी मिळवत असतात. दिवंगत कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी तब्बल ३७ वर्षांपूर्वी लिहलेल्या 'शिवाजी कोण होता', या पुस्तकाच्या शीर्षकाबाबत गायकवाड यांना अचानक साक्षात्कार झाला आहे. त्यांनी या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोन करुन जीवे मारण्याची धमकी दिली आहे.

पुढे रोहिणी खडसे म्हणाल्या, श्री. गायकवाड यांच्याकडून आपण अपेक्षा तरी काय करू शकतो? वाचन आणि त्यांचा काही दूर दूरपर्यंत काही संबंध असेल याची शक्यता कमीच आहे. पण समाजात वितुष्ट निर्माण करण्यात, लोकांमध्ये संभ्रम निर्माण करण्यात सत्ताधाऱ्यांनी पीएचडी घेतली आहे. खरंतर हे लोक लिटमस टेस्ट करत असतात, समाजात याची काय रिऍक्शन येते ते हे लोक पाहत असतात. पण कॉम्रेड पानसरेंसारखी विवेकी माणसं शेवटच्या क्षणापर्यंत समाजाची एकी आणि सत्याची कास धरून असतात, म्हणूनच ते अमर ठरतात, असे खडसे यांनी म्हटले आहे.काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी देखील आमदार संजय गायकवाड यांच्या विधानावर टीका केली आहे. त्यांनी म्हटले की, लेखन स्वातंत्र्य, वाचन स्वातंत्र्य जे काही स्वातंत्र्य आहे ते संविधानाने दिले आहे. छत्रपती शिवरायांच्या बाबतीत कोणी चुकीचे लेखन केले असेल तर ते पापच आहे असे मी म्हणेल. परंतु, अशी धमकी जर कोणी दिली असेल तर ते चुकीचे आहे.

पुढे बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले, त्या आमदारावर गुन्हा दाखल केला पाहिजे आणि त्या प्रकाशकाला संरक्षण दिले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज हे सगळ्यांचे राजे होते. पानसरे यांनी लिहिलेले पुस्तक ते बरोबरच होते आणि म्हणूनच त्यांना धमकी मिळत आहे, असे वडेट्टी वार म्हणाले.

विजय वडेट्टीवार यांनी ट्विट करत म्हटले की, बहुजनांचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे वास्तव चित्रण कॉ. गोविंद पानसरे यांनी शिवाजी कोण होता? या पुस्तकात केले आहे. या पुस्तकाचे प्रकाशक तथा पुरोगामी विचारांचे कार्यकर्ते श्री. प्रशांत आंबी यांना सत्ताधारी पक्षाचे आमदार संजय गायकवाड यांनी "पानसरेचे जे हाल केले, तसे हाल करू" अशी धमकी दिली आहे. छत्रपती शिवरायांचे विचार जनमानसात रुजवण्यासाठी कॉ. गोविंद पानसरे यांनी संपूर्ण जीवन समर्पित केले. अशा महान विचारवंताचा धर्मांध शक्तींनी खून केला, त्यांच्या गुन्हेगारांना अजूनही शिक्षा झालेली नाही.

## उद्धव ठाकरेंनीच विधानपरिषदेची निवडणूक लढवावी : खासदार सुप्रिया सुळे



**मुंबई :** राज्यातील विधानपरिषदेच्या १० जागांसाठी निवडणुका जाहीर झाल्या असून शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचा कार्यकाळ संपल्याने रिक्त झालेल्या जागेवर कोणाची वर्णी लागणार, याची मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. या जागेसाठी महाविकास आघाडीतून काँग्रेसने आधीच अनुकूलता दर्शवली असताना, आता खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्विट करत उद्धव ठाकरेंनीच पुन्हा निवडणूक लढवावी, अशी विनंती केल्याने शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही त्यांच्याच नावाला पसंती दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

विधानपरिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतील मित्रपक्षांनी उद्धव ठाकरे यांनीच पुन्हा निवडणूक लढवावी यासाठी आग्रह धरला असून, काँग्रेसचे हर्षवर्धन सपकाळ यांनी 'मातोश्री'वर जाऊन तर विजय वडेट्टीवार यांनी सोशल मीडियाद्वारे ही भूमिका स्पष्ट केली आहे. त्यातच आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही ट्विटद्वारे ठाकरेंना निवडणूक लढवण्याची विनंती केल्याने, संपूर्ण आघाडीचा त्यांनाच पाठिंबा असल्याचे स्पष्ट होत असून आता उद्धव ठाकरे स्वतः काय निर्णय घेतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

सुप्रिया सुळे यांनी ट्विट करत म्हटले की, महाराष्ट्रात विधानपरिषदेची निवडणूक होऊ घातलेली आहे. ही निवडणूक राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांनीच लढावी अशी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची आग्रहाची विनंती आहे. उद्धवजी हे राज्यातील ज्येष्ठ व अनुभवी नेते आहेत. त्यांच्या अनुभवाचा राज्याला तसेच सभागृहाला सदैव फायदाच होत राहील, असा आम्हा सर्वांना विश्वास आहे. उद्धवजींनी या मागणीचा सकारात्मक विचार करावा ही नम्र विनंती, असे म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २४ एप्रिल २०२६


## जिंतूरमध्ये भीमजयंती मिरवणुकीत गोंधळ; पोलीस निरीक्षकावर कारवाईची मागणी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** जिंतूर शहरात 14 एप्रिल 2026 रोजी आयोजित करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भीमजयंती मिरवणुकीदरम्यान गोंधळ व तणावाचे वातावरण निर्माण झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी स्थानिक आंबेडकरी समाजाच्या वतीने पोलीस प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली असून संबंधित पोलीस निरीक्षक गजेंद्र सरवदे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.निवेदनानुसार, दरवर्षीप्रमाणे यंदाही जिंतूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम व भीमजयंती मिरवणूक आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर महिला, पुरुष व ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते.मात्र, 14 एप्रिल रोजी मिरवणुकी दरम्यान काही समाजविघातक व्यक्तींनी आपसात गोंधळ घालत गैरकायद्याची मंडळी जमवून दगडफेक केली होती, त्यामुळे परिसरात जुने संतोषी मानसिकतेच्या बाहेरून आलेल्या लोकांनी वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावेळी पोलीस प्रशासनाला सहकार्य करणाऱ्या उपस्थित भीमानुयायांवर पोलिसांकडून लाठीचार्ज केला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही ठिकाणी धक्काबुक्की, किरकोळ वाद आणि तणाव निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.आंबेडकरी समाजाच्या म्हणण्यानुसार, या सर्व प्रकाराला पोलीस प्रशासनाचे अपयश कारणीभूत असून विशेषतः जिंतूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी योग्य नियोजन व नियंत्रण न ठेवल्यामुळे परिस्थिती हाताबाहेर गेली. त्यामुळे भीमजयंतीसारख्या सामाजिक एकतेच्या कार्यक्रमाला गालबोट लागल्याचा आरोप करण्यात आला आहे.या घटनेच्या निषेधार्थ आंबेडकरी समाजाच्या वतीने पोलीस अधीक्षकांकडे लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनात संबंधित पोलीस निरीक्षक गजेंद्र सरवदे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची तसेच संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.तसेच, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी योग्य नियोजन व कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्याची मागणीही करण्यात आली आहे. अन्यथा आंबेडकरी समाजाच्या वतीने मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. सादर निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते ॲड. चंद्रकांत बहिरट, रत्नदीप शेजावळे भिक्खू महानंद, शरद चव्हाण, महेंद्र बनसोडे, गणेश काकडे, मोहन घनसावध, धम्मक्रांती वाघ, लखन कुरे, सतिश अंभोरे, मधुकर बनकर, संजय घनसावध, प्रकाश गायकवाड यांच्या स्वाक्षरी असल्यांचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## वेरूळ बसस्थानकात स्मार्ट सिटी बसचा स्फोट



**छत्रपती संभाजीनगर :** वेरूळ येथील भोसले चौक बसस्थानकात बुधवारी सायंकाळी घडलेल्या एका घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली. 'स्मार्ट शहर बस' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मनपा बसच्या इंजिनमध्ये अचानक स्फोट झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. स्फोटानंतर काही क्षणांतच बसमधून मोठ्या प्रमाणात धूर बाहेर पडू लागला. त्यामुळे बसस्थानक परिसरात उपस्थित असलेले लोक घाबरून इथून तिथे पळू लागले.ही बस छत्रपती संभाजीनगर ते वेरूळ या मार्गावर धावणारी असून, ती बिघाडामुळे भोसले चौकात दुरुस्तीसाठी उभी करण्यात आली होती. सुदैवाने या बसमध्ये त्या वेळी एकही प्रवासी नव्हता. त्यामुळे संभाव्य मोठी जीवितहानी टळली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, दुरुस्ती सुरू असताना अचानक इंजिनमधून मोठा आवाज झाला आणि लगेचच धुराचे लोट बाहेर येऊ लागले. या घटनेने काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या तापमानाचा परिणाम बसच्या कार्यक्षमतेवर होत असल्याचे समोर येत आहे. उन्हाच्या तीव्रतेमुळे 'स्मार्ट शहर बस' वारंवार बंद पडत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. बुधवारी घडलेल्या या प्रकारातही उन्हामुळे इंजिन अधिक तापले असावे आणि त्यामुळेच स्फोट झाला असावा, असा प्राथमिक अंदाज चालकाने व्यक्त केला आहे.

या स्फोटानंतर वेरूळ परिसरातील नागरिक, पर्यटक आणि भाविकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. विशेषतः वेरूळ लेणी आणि घृष्णेश्वर मंदिर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असते. त्यामुळे बससेवेच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. आता सिटी बसने प्रवास करणे सुरक्षित आहे का? असा सवाल अनेकांच्या मनात निर्माण झाला आहे. या घटनेमुळे सार्वजनिक वाहतुकीवरील विश्वास डळमळीत झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

घटनेची माहिती मिळताच मनपा परिवहन विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी परिस्थितीची पाहणी केली. बसच्या इंजिनचा स्फोट नेमका कशामुळे झाला, याचा शोध घेण्यासाठी तांत्रिक तपासणी केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर सर्व बसांची विशेष तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जाईल, असे आश्वासन देण्यात आले आहे. दरम्यान, या घटनेनंतर वेरूळमध्ये भीतीचे वातावरण असले तरी मोठी दुर्घटना टळल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २४ एप्रिल २०२६


## महानगरपालिका शाळा चिकलठाणा : क्रीडा व वाचन सप्ताहाचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या शाळेत दिनांक 23 एप्रिल ते 30 एप्रिल 2026 दरम्यान महानगरपालिकेच्या वतीने क्रीडा सप्ताह तसेच शाळेच्या वतीने जागतिक पुस्तक दिन व वाचन प्रेरणा सप्ताह चे आयोजन करण्यात आलेले आहे यामध्ये विद्यार्थ्यांचे विविध खेळ तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाविषयी गोडी निर्माण व्हावी यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त जागतिक पुस्तक दिन व वाचन प्रेरणा सप्ताह आयोजन करण्यात आले आहे यामध्ये विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय व गोडी लागावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे कार्यक्रमाची सुरुवात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस शाळेचे मुख्याध्यापक संजय मडके यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला त्यानंतर विद्यार्थ्यांना वाचनासाठी विविध विषयाचे पुस्तक याचे वाचन केले तसेच शाळेच्या ग्रंथालयामधून विद्यार्थ्यांना विविध विषयाचे पुस्तक व लेखकाचे व समाजसेवकांचे व क्रांतिकारकांचे पुस्तक वाचनासाठी देण्यात आले तसेच शाळेमध्ये कॅरम बॅडमिंटन खो-खो बुद्धिबळ हे खेळ सुद्धा घेण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बेबी राऊत यांनी केले तसे आभार प्रदर्शन जाहेद खान पठाण यांनी मानले यानिमित्त शाळेतील इतर शिक्षक वसंत राठोड सर्जेराव वाघ, जाहेद खान पठाण संदीप चव्हाण, चरण सिंग सूर्यवंशी, बेबी राऊत, अर्चना भारद्वाज, अनुजा भिंगोले, मंगल तारो, मनीषा शिंदे तसेच शाळेतील बालवाडी शिक्षिका विद्या सासवडे, नीलिमा कवठेकर, शाळेतील शिपाई व सेविका सुजाता भोसले, सुनिता साबळे हे उपस्थित होते


### जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-


## सजीवनी समाधी शतकोत्तर सोहळयानिमित्त अतनुर येथे भक्तीचा महापुर



**अतनुर (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** जळकोट तालुक्यातील अतनूर येथील श्री.सदगुरू घाळेप्पा स्वामी महाराज यांच्यासजीवनी समाधी सोहळ्यानिमित्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी १५० व्या. सजीवनी समाधी सोहळ्यानिमित्त श्री.काशी विश्वनाथ महादेव मंदिर संस्थांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व शिवपुराण महाकथेला अतनूर येथे महाशिवपुराण कथाकार व किर्तनकारांसह हा धार्मिक सोहळा आयोजित करण्यात आला असून परिसरात आनंदमय वातावरण निर्माण झाले आहे. दैनंदिन भरगच्च कार्यक्रम या सप्ताहामध्ये दररोज पहाटे ६ ते ७ श्री. घाळेप्पा स्वामी महाराजांचा रुद्राभिषेक, ७ ते १० श्री. ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, १० ते १२ गाथा वरील भजन, २ ते ५ महापुराण कथा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, ९ ते ११ हरिकिर्तन, रात्री १२ ते ४ हरिजागर, पहाटे ४ ते ६ काकडा आरती, दररोज अशा वेळेनुसार कार्यक्रम होत आहेत . महाराष्ट्रातील नामावंत कीर्तनकाराची कीर्तन रंगतदार होणार आहेत. हरीजागर कीर्तन महोत्सवाला प्रमुख वक्ते सप्ताहात दररोज विविध मान्यवर कीर्तनकाराची सेवा लाभणार आहे. दुपारी दोन ते पाच या वेळेत दिव्य महाप्रसादाचे भाविकांसाठी आयोजन करण्यात आले आहे.श्री सदगुरू श्री घाळेपा स्वामी महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी 150 व्या संजीवनी समाधी सोहळा निमित्त महाशिवपुराण कथा व, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह निमित्य भव्य महाप्रसाद श्री तानाजीराव सोमुसे व श्री मनोहरराव मुगदळे यांच्या आयोजित महाप्रसादाच्या सुंदर जेवनाबद्दल.... आजच्या या पवित्र हरिनाम सप्ताह मध्ये अन्नाचा गोडवा आणि श्रद्धेचा ओलावा दोन्ही पाहायला मिळाले विशेषतः चुलीवरच्या भाकरीचा व भोकरीवरणाचा गावरान स्वाद गरमागरम वरण भात , कांदा काकडी, लिंबू यामुळे या महाप्रसादाची लज्जत अधिकच वाढली अन्नदात्यांनी अतिशय प्रेमाने आणि श्रद्धेने हे भोजन वाढले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार हे अन्न ग्रहण करून आमचे शरीर आणि मन दोन्ही तृप्त झाले आहेत धन्यवाद.... विठ्ठलाच्या नामाचा गजर आणि त्यात जोडीला चुलीवरच्या भाकरी व भोकरी वरणाचा तो अस्सल सुवास आजच्या पंगतीत वरण-भात आणि भोकरीचा बेत होता त्याने साक्षात पंढरपूरच्या महाप्रसादाची आठवण करून दिली जेवण केवळ पोट भरण्यासाठी नव्हतं तर त्यात गावातील माणसाच्या माणुसकीचा आणि भक्तिचा स्वाद होता इतका सुंदर महाप्रसाद तयार करणाऱ्या सर्व स्वयंपाकी बांधवांचे यजमान अन्नदात्याचे व मंदिर कमिटीचे आयोजकाची व समस्त गावकऱ्यांचे आम्ही खरोखरच ऋणी आहोत.अन्न हे पूर्ण ब्रम्ह यांचा प्रत्यय आज आम्हाला आला आहे धन्यवाद व आभार.मच्या प्रारब्धात हा अतनुर मधील सुवर्ण क्षण पहायला मिळाला. या सोहळ्याला पंचकोशीतील व परिसरातील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आव्हान श्री.महादेव मंदीर मंदिराचे तसेच काशी विश्वनाथ संस्थान मंडळाचे पदाधिकारी व भजनी मंडळ व समस्त गावकरी मंडळी अतनूर यांच्या वतीने करण्यात आले.

## १५ ऑगस्टपर्यंत रेल्वे सुरू झालीच पाहिजे; रस्त्यातील ब्लॅकस्पॉट कमी करा - रेल्वे व महामार्ग आढावा बैठकीत खा. बजरंग सोनवणे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना



**बीड (भगवंत पाळवदे) : :** मागील दोन वर्षात रेल्वे कामाला गती दिलेली आहे. आता रेल्वेचे काम युध्द पातळीवर करून १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत पुणे ते परळी रेल्वे धावलीच पाहिजे, शिवाय बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गासहित ग्रामीण मार्गावरील ब्लॅकस्पॉट कमी करण्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत, असे निर्देश खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे व राष्ट्रीय महामार्ग आढावा बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले.जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभागाच्या हॉलमध्ये रेल्वे आणि राष्ट्रीय महामार्ग आढावा बैठकीचे आयोजन केले होते. बैठकीत विविध प्रलंबित कामे, भूसंपादन, निकृष्ट दर्जा, अपघातप्रवण ठिकाणे व नागरिकांच्या अडचणी यांसह सर्वच मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. ००रेल्वे कामांचा घेतला सखोल आढावारेल्वे विभागाच्या आढाव्यात अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्गाच्या सर्व टप्प्यांवरील कामांचा सखोल आढावा घेण्यात आला. ३१ मे पर्यंत परळीपर्यंत रेल्वे ट्रॅक आणि जून महिन्यात रेल्वे चाचणी होणे अपेक्षित आहे.आष्टी स्थानकास वीज जोडणी, बीड-वडवणी, वडवणी-सिरसाळा व सिरसाळा-परळी या टप्प्यांतील सिव्हिल वर्क, भूसंपादन, अर्थवर्क व रुळ अंथरण्याच्या कामांबाबत माहिती घेण्यात आली. बीड-नगर-मुंबई व बीड-नगर-पुणे इंटरसिटी सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली. आष्टी, पाटोदा, शिरूर व बीड तालुक्यातील अनेक गावांमध्ये रोड ओव्हर ब्रिज उभारण्याची गरज मांडण्यात आली असून, त्यासाठी प्रस्तावांची सद्यस्थिती विचारण्यात आली. बार्शीनाका येथे अतिरिक्त रेल्वे थांबा, पालवन व बार्शी नाका स्थानकांसाठी पार्किंग सुविधा, तसेच सर्व स्थानकांसाठी सोलर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे निर्देश देण्यात आले. उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद नवीन रेल्वेमार्ग सर्वेक्षण, प्रकल्पाची व्यवहार्यता, तसेच प्रलंबित भूसंपादन प्रकरणे तातडीने निकाली काढण्यावर भर देण्यात आला. ००घाटनांदूर रेल्वेथांब्यासाठी प्रस्ताव द्याघाटनांदूर रेल्वे स्टेशनवर विविध रेल्वेंना थांबा देणे आवश्यक असून त्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी रेल्वे थांबा देणेबाबत तातडीने केंद्राकडे प्रस्ताव सादर करावा, त्यासाठी मी पाठपुरावा करेल, अशा सुचना खा.सोनवणे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, रेल्वे व राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी उपस्थित होते. खा.बजरंग सोनवणे यांनी बैठकीत अंबाजोगाई, केज, नेकनूर, मांजरसुंबा, पाटोदा व माजलगाव शहरांभोवती बायपास व उड्डाणपूल उभारण्याचा मुद्दा उपस्थित केला. अपघातप्रवण ठिकाणांची तातडीने दुरुस्ती, पिंपळा धायगुडा-लोखंडी, सावरगाव-केज-मांजरसुंबा-पाटोदा-चुंबळी फाटा हा रस्ता दुहेरी करणे, तसेच अंबाजोगाईतील यशवंतराव चव्हाण चौकात फूटओव्हर ब्रिज उभारण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. सुरत-चेन्नई राष्ट्रीय महामार्गासाठी आवश्यक भूसंपादनाची सद्यस्थितीही तपासण्यात आली. खरवंडी-मादळमोही-पाडळसिंगी-गढी-माजलगाव मार्गावरील खराब रस्त्यामुळे होत असलेल्या अपघातांबाबत तक्रारी येत आहेत. तालखेड फाटा, शृंगारवाडी फाटा यांसह विविध ठिकाणी तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. माजलगाव-धारूर-केज (रामा ५४८ सी) रस्त्याचा दर्जा अत्यंत खराब असल्याने संबंधित एजन्सीकडून तातडीने दुरूस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. धारूर घाटातील थेटेगव्हाण पर्यायी मार्ग, तसेच बर्दापूर-लोखंडी सावरगाव दुहेरीकरणाच्या निविदांबाबत माहिती घेण्यात आली. पाटोदा व आष्टी तालुक्यातील अंमळनेर-टाकळी काजी तसेच गेवराईतील राक्षसभुवन फाटा-उमापूर-शेवगाव या रस्त्यांना राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २४ एप्रिल २०२६


# पंचायती राज : तळागाळातील लोकशाहीचा पाया

**भा**रताची लोकशाही ही केवळ निवडणुकांच्या चौकटीत मर्यादित न राहता ती समाजाच्या तळागाळात रुजलेली, प्रत्येक नागरिकाच्या सहभागातून साकार होणारी एक सजीव व्यवस्था आहे. या व्यवस्थेचे सर्वात भक्कम अधिष्ठान म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था आणि त्या संस्थांच्या केंद्रस्थानी असलेली पंचायती राज प्रणाली होय. दरवर्षी २४ एप्रिल रोजी साजरा केला जाणारा 'राष्ट्रीय पंचायती राज दिन' हा या व्यवस्थेच्या ऐतिहासिक वाटचालीचे, तिच्या कार्यक्षमतेचे आणि लोकशाहीतील तिच्या अनन्यसाधारण योगदानाचे स्मरण करून देणारा अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस आहे. हा दिवस केवळ उत्सव म्हणून साजरा करण्यापुरता मर्यादित नसून स्थानिक लोकशाही अधिक सक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी बनवण्याचा एक सामूहिक संकल्प व्यक्त करण्याची संधी देतो.भारतीय संस्कृतीच्या पायाभूत रचनेत 'ग्राम' ही संकल्पना केंद्रस्थानी आहे. प्राचीन काळापासून गाव हे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाचे केंद्र राहिले आहे. गावपातळीवर लोकांनी एकत्र येऊन आपले प्रश्न सोडवण्याची परंपरा होती. ग्रामसभा ही केवळ एक बैठक नसून ती लोकशाहीची मूळ शाळा होती, जिथे संवाद, चर्चा आणि सहमतीच्या आधारे निर्णय घेतले जात. ही परंपरा पुढेही विविध स्वरूपांत टिकून राहिली. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात महात्मा गांधी यांनी 'ग्रामस्वराज्य' या संकल्पनेला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मते, भारताचा खरा विकास हा गावांच्या स्वायत्ततेत आणि स्वावलंबनात आहे. प्रत्येक गाव हे एक स्वतंत्र प्रजासत्ताक असावे, जेथे लोक स्वतःच्या गरजांनुसार निर्णय घेतात आणि विकासाची दिशा ठरवतात, ही त्यांची भूमिका होती.स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही शासनपद्धती स्वीकारली, परंतु सुरुवातीच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांना अपेक्षित ते बळ मिळाले नाही. ग्रामीण विकासासाठी विविध योजना राबवण्यात आल्या, मात्र त्या योजनांच्या अंमलबजावणीत स्थानिक लोकांचा सहभाग कमी असल्याने अपेक्षित परिणाम साध्य होत नव्हते. या पार्श्वभूमीवर १९५७ साली स्थापन झालेल्या बलवंतराव मेहता समितीने पंचायती राज व्यवस्थेची पुनर्रचना करण्याची शिफारस केली. या समितीने ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या त्रिस्तरीय रचनेची संकल्पना मांडली. या रचनेमुळे स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याचे अधिकार लोकप्रतिनिधींना देण्यात आले आणि प्रशासन अधिक लोकाभिमुख बनले.पुढील काळात अशोक मेहता समिती, जी. व्ही. के. राव समिती आणि एल. एम. सिंगवी समिती यांनी पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. या सर्व प्रयत्नांचा परिपाक म्हणून १९९२ साली भारतीय संविधानात ७३वी घटनादुरुस्ती करण्यात आली आणि २४ एप्रिल १९९३ पासून ती अंमलात आली. याच ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी २४ एप्रिल हा दिवस 'राष्ट्रीय पंचायती राज दिन' म्हणून साजरा केला जातो. या दुरुस्तीमुळे पंचायती राज संस्थांना संविधानिक दर्जा मिळाला आणि त्यांच्या अधिकार व जबाबदाऱ्यांची स्पष्ट मांडणी करण्यात आली.७३व्या घटनादुरुस्तीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामसभेला दिलेले महत्त्व होय. ग्रामसभा ही स्थानिक लोकशाहीची मूलभूत यंत्रणा आहे. गावातील सर्व प्रौढ नागरिक हे ग्रामसभेचे सदस्य असतात आणि ते थेट निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ शकतात. यामुळे लोकशाही अधिक व्यापक आणि समावेशक बनते. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या संस्थांना विविध विकासकामांसाठी अधिकार देण्यात आले. नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेख या सर्व प्रक्रियांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग वाढवण्यात आला.या व्यवस्थेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक न्यायाची अंमलबजावणी. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिलांसाठी आरक्षणाची तरतूद करून समाजातील वंचित घटकांना सत्तेत सहभागी होण्याची संधी देण्यात आली. विशेषतः महिलांसाठी किमान एक तृतीयांश आरक्षणामुळे ग्रामीण भागात महिला नेतृत्वाची एक नवीन लाट निर्माण झाली आहे. आज अनेक महिला सरपंच, पंचायत सदस्य आणि जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून प्रभावीपणे काम करत आहेत. त्यांच्या नेतृत्वामुळे ग्रामीण विकासात संवेदनशीलता आणि समावेशकता वाढली आहे.पंचायती राज व्यवस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे स्थानिक पातळीवर लोकांच्या सहभागातून विकास साध्य करणे हा आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, शेती, रोजगारनिर्मिती यांसारख्या विविध क्षेत्रांत ग्रामपंचायती महत्त्वाची भूमिका बजावतात. सरकारच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे कार्य या संस्थांमार्फतच केले जाते. त्यामुळे पंचायती राज व्यवस्था ही ग्रामीण विकासाचा कणा म्हणून ओळखली जाते.तथापि, या व्यवस्थेसमोर अनेक आव्हाने देखील आहेत. आर्थिक स्वायत्ततेचा अभाव, प्रशासकीय अडथळे, अधिकारांचे केंद्रीकरण आणि राजकीय हस्तक्षेप यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. काही ठिकाणी पारदर्शकतेचा अभाव आणि भ्रष्टाचाराच्या समस्या देखील आढळतात. ग्रामसभांमध्ये नागरिकांचा कमी सहभाग हा देखील एक गंभीर मुद्दा आहे. लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित न राहता ती सततच्या सहभागातून सशक्त होते, ही जाणीव समाजात रुजवणे आवश्यक आहे.या आव्हानांवर मात करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक आर्थिक स्वायत्तता देणे गरजेचे आहे. त्यांना करआकारणीचे अधिकार वाढवणे, निधीचे योग्य वितरण करणे आणि त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित करणे आवश्यक आहे. स्थानिक प्रतिनिधींना प्रशिक्षण देऊन त्यांची प्रशासनिक क्षमता वाढवणे आवश्यक आहे. ग्रामसभेचे महत्त्व वाढवून नागरिकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हीदेखील अत्यंत आवश्यक बाब आहे.आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल साधनांचा वापर करून पंचायती राज व्यवस्थेला अधिक प्रभावी बनवता येते. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून कामकाज अधिक पारदर्शक आणि जलद होते. नागरिकांना माहिती सहज उपलब्ध होते आणि सेवा सुलभपणे मिळतात. सामाजिक लेखापरीक्षण, माहितीचा अधिकार आणि जनसहभागाच्या विविध माध्यमांद्वारे उत्तरदायित्व वाढवता येते.राष्ट्रीय पंचायती राज दिन हा केवळ एक स्मरणदिन नसून तो स्थानिक लोकशाहीच्या बळकटीकरणाचा उत्सव आहे. या दिवशी देशभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींचा सन्मान केला जातो आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्याचा आढावा घेतला जातो. यामुळे इतर संस्थांना प्रेरणा मिळते आणि विकासाची नवी दिशा मिळते.आज भारत वेगाने प्रगती करत असताना ग्रामीण भागाचा विकास हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा ठरतो. शाश्वत विकास साध्य करण्यासाठी स्थानिक पातळीवर नियोजन आणि अंमलबजावणी आवश्यक आहे. पंचायती राज संस्था या प्रक्रियेत केंद्रस्थानी आहेत. त्या केवळ विकासाच्या यंत्रणा नसून लोकशाहीच्या जडणघडणीचा पाया आहेत.शेवटी, राष्ट्रीय पंचायती राज दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व ओळखून त्यांना बळकट करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने ग्रामसभेत सहभागी होऊन निर्णय प्रक्रियेत भाग घेतला पाहिजे. स्थानिक प्रश्नांवर चर्चा करून त्यांचे समाधान शोधले पाहिजे. लोकशाही ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. पंचायती राज व्यवस्था ही भारतीय लोकशाहीची खरी ओळख आहे आणि तिच्या सशक्तीकरणातूनच देशाचा समतोल, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकास साध्य होऊ शकतो.




**डॉ. राजेंद्र बगाटे,**

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

bagate.rajendra5@gmail.com


## भित्रा रामू

आमचा रामू
भारी भित्रा
घरात बसतो दडून
पाहून बाहेर कुत्रा

एकदा तर त्याची
खूप मजा आली
एकटाच घरी असतांना
अचानक लाईट गेली

आता काय करावे
सुचेना त्याला काही
जोरजोराने ओरडायचा
कुठे गेलीस आई?

एक भुकेला उंदीरमामा
खाण्याच्या शोधात आला
खड् खड् आवाजाने
रामू घाबरून गेला

शुक् शुक् करतांना
भीतीने गाळण उडाली
अचानक लाईट येताच
हसू आले गाली




**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## ज्ञानाचा मार्ग

वाचूनिया पुस्तक,
वाढवावेच ज्ञान.
समाजात मिळेल,
सदा तुला मान. १

पुस्तकातून मिळते,
ज्ञानाचा मार्ग नवा.
दररोज नवे पुस्तक,
वाचायलाच हवा. २
यशस्वीतेचा मार्ग,
पुस्तकातून मिळते.
वाचल्यास पुस्तक,
दारिद्य दूर पळते. ३

पुस्तक वाचतांना,
नतमस्तक व्हावे.
सदा वाचनाचे धडे,
नव तरुणांना द्यावे. ४

वाचल्यास पुस्तक,
होते सशक्त मस्तक.
होत नाही कधीच,
कोणाचेच हस्तक. ५




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**



**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २४ एप्रिल २०२६


# मौजे खुल्लोड : गावपण जपणारं गाव



**खु**ल्लोड या सिल्लोड तालुक्यातील गावास नुकतीच भेट दिली. हे गाव उंडणगाव जवळ असून या गावास मी यापूर्वीही भेटी दिलेल्या आहेत. कै. नानासाहेब वाघ यांचे हे गाव. या गावात वंजारी, माळी व अन्य समाजाचे लोक वास्तव्यास आहेत. या गावाजवळून जुई ही नदी उगम पावते. गावाच्या वरच्या बाजूस एक छान पुरातन मंदिर आहे येथूनच या नदीचा उगम होतो, पुढे ही नदी भोकरदन तालुक्यात प्रवाही होते. या गावात पुरातन मोठ मोठे वाडे आहेत. काही वाडे आजही सुस्थितीत असून लोक वास्तव्य करतात, तर काही वाड्याची पडझड झाल्याचे दिसून येते. उत्तम शेती करणारे शेतकरी या गावात आहेत. काही गुत्तेदारी करतात तर काही लोक भुसार मालांचे खरेदी विक्री करतात. बहुतांश लोकांचा संबंध हा सिल्लोड शी आहे. .सिल्लोड तालुक्यात खुल्लोड, निल्लोड ही गावे आहेत. सिल्लोड, निल्लोड आणि खुल्लोड यांचा काही तरी अनुबंध असावा, मात्र या संदर्भात ग्रामस्थाशी चर्चा केली असता फारसे संदर्भ मिळाले नाही. मी निल्लोड ला ही दोन तीन वेळा गेलेलो आहे. खुल्लोड या गावाच्या ग्रामनाम संदर्भात ही नागरिकांशी चर्चा केली असता समाधानकारक माहिती मिळाली नाही. गावात संत भगवान बाबा यांचे भव्य स्मारक साकारत असून संत भगवान बाबांची पुण्यतिथी दरवर्षी मोठ्या स्वरूपात संपन्न होते. त्यानिमित्ताने ही एकदा व्याख्यानास मी या गावात गेलो होतो. गावातील पुरातन वाड्यास फार मोठा इतिहास असून त्याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. तसेच ही वाडे जतन व संवर्धन करून ठेवल्यास फार मोठा ऐतिहासिक ठेवा पुढच्या पिढीसाठी राहील. निसर्ग रम्य परिसर असून अनेक छोटी मोठी मंदिरे या गाव परिसरात आहेत. गावात धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे होतात. गावपण जपणारे हे गाव आहे. उंडणगाव या गावाला एक सांस्कृतिक व धार्मिक परंपरा आहे. अनेक उपक्रम येथे संपन्न होतात. डॉ. अनिरुद्ध नाईक,डॉ. भागवत वाघ यांनी या परिसरावर लेखन केलेले आहे. सुप्रसिद्ध चित्रकार व लेखक सरदार जाधव यांचे गाव ही याच परिसरात आहे. आमचे हुसे परिवाराचे एक कुटूंब या गावात आहे. चंद्रभान हुसे हे सामाजिक कार्यकर्ते ही आहेत. गावातील व सिल्लोड येथील सामाजिक उपक्रमात त्यांचा सातत्याने सहभाग असतो. या परिसराकडे अभ्यासक ,संशोधकांनी लक्ष देवून त्याचा अभ्यास केल्यास मोठा इतिहास व समृद्ध वारसा पुढे येईल. या परिसरास पुन्हा एकदा भेट देवून हा परिसर समजून घेण्याची ईच्छा आहे. अभ्यासकांनी या परिसरास आवश्य भेट द्यावी.वंजारी माळी कोळी भिल्ल ,न्हावी सुतार ,मातंग ,न्हावी अशा अनेक समाजाचे लोक येथे वास्तव्यास आहेत. या गावाला लागूनच असलेली जुई नदी या नदीचा उगम स्थान गावापासून दोन किलोमीटर अंतरावर असलेले खोलेश्वर महादेव मंदिर या ठिकाणाहून झालेला आहे या मंदिराच्या बाजूला गणपती मंदिर व कार्तिक स्वामी चे मंदिर आहे गावामध्ये खूप वर्षापूर्वीचे दोन नर व मादी ताड नावाचे झाड या गावांमध्ये हनुमान मंदिराच्या पाठीमागे निसर्गरम्य वातावरणात डोलत असतात या ताडाच्या झाडांच वैशिष्ट्ये असे आहे की ताड फळ नावाने या झाडाला फळे लागतात जुलै ऑगस्टमध्ये या झाडाचे फळे ऑटोमॅटिकली खाली पडत असतात फळ खूप मजबूत असते दगडाने मोठ्या दगडाने फोडून त्याला खावं लागत असे गावामध्ये एक जुने एक परमार्थिक खंडोबाचे असीम भक्त या गावांमध्ये भगत मामा म्हणून वास्तव्यास असायचं त्यांना असे जुने जाणते वयस्कर असलेले सांगतात की भगत मामा साक्षात खंडोबा महाराजांसोबत त्यांची भेट व्हायची व ते षष्ठी च्या दिवशी एका खड्ड्यात बसून वरतून कपडा झाकल्याचा नंतर ते चाफ्याचे फुले व खोबरे भांडार त्या मोठ्या खड्ड्यातून घेऊन यायचे असे आख्यायिका अज ही या गावांमध्ये जुने खंडोबाचे भक्त जसे की गंगाधर बंडू वाघ बाबा रामहरी भीमराव वाघ रघुनाथ भिमराव वाघ सपकाळ बाबा मोतीराम दांडगे गणेश लांडगे माणीक कारभारी वाघ शेषराव दाडगे आसाराम ताठे असे बरेचसे भक्तगण या मामाचे आजही या गावांमध्ये वास्तव्यास आहेत .गावाच्या दक्षिणेस डोंगर कठाड्यावर खंडोबा देवस्थान आहेत मध्यभागी पांडुरंगाचे मंदिर आहे व उत्तरे हनुमंताचे मंदिर आहे या हनुमंताच्या मंदिराच्या बाजूला परबत बाबाची समाधी आहे शंभर दीडशे वर्षापूर्वी परबत बाबा नावाचे एक संत या गावामध्ये वास्तव्यास होते. परबत बाबाची सुद्धा वेगवेगळे आख्यायिका या परिसरात प्रसिद्ध आहे. या गावाला पीएसआय व डॉक्टर पोलीस खात्यामध्ये सुद्धा बरेचसे मुले आजही कार्यरत आहेत भूमि अभिलेख मध्ये कॉलेजेस शिक्षक पोस्ट खाते व देशसेवेसाठी वेगवेगळ्या फोर्स मध्ये सुद्धा या गावातील चार पाच युवक कार्यरत आहेत प्राध्यापक, शिक्षण विशेषता देशाच्या बाहेर सुद्धा सोपान गणपत वाघ व निवृत्त पोलीस रामहरी वाघ यांचे मुले यांनी एक वेगळी ओळख निर्माण केलेली आहे अनेक वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत आत्ताच झालेल्या झेडपी निवडणुकीमध्ये एसटी राखीव जागेवर डॉक्टर सचिन वाघ जिल्हा परिषद सदस्य पदी कुठलाही राजकीय वारसा नसताना निवडून आलेले आहे वेगवेगळ्या क्षेत्रात व्यापारी उंडणगाव बाजारपेठेत सिल्लोड बाजारपेठामध्ये भुसार मालाचे व्यापारी कृषी सेवा हार्डवेअर हॉटेल लाईन मध्ये प्लॉटिंग क्षेत्रात दत्तात्रय गंगाधर वाघ गावातील बिल्डर क्षेत्रामध्ये पहिले नाव वेगवेगळ्या क्षेत्रात या गावातील नामांकित व्यापारी आहे ,विशेषतः जुन्या काळापासून खुल्लोड कॉन्ट्रॅक्टकारांचे गाव म्हणून ओळख होती जसे की, सुरुवातीचे आमचे कैलासवासी नानासाहेब बाजीराव वाघ व गणपत भावडू वाघ हे दोन्हीही कॉन्ट्रॅक्टर यांच्या नावाने जुनी ओळख होती नंतर जसजशी प्रगती झाली तसेच बरेचसे नवीन नवीन कॉन्ट्रॅक्टर उदयास आले जुन्या काळापासून चालत आलेले विशेष परंपरा म्हणजे पैलवान कै. मल्हारी नागोराव वाघ छगन कारभारी वाघ ,अरुण बाबुराव वाघ ,मोतीराम दांडगे, सुदाम गवळी ,तुकाराम घुगे ,दिल्ली पोलीस ,पंढरी मामा घुगे असे अनेक पैलवान या गावातून होऊन गेले व त्यांचाच वारसा म्हणून पुढे अनेक नवीन नवीन पहिलवान या गावांमध्ये उदयास आले आहेत. पैलवानाचे गाव म्हणूनही या गावाची ओळख आहे. असे हे आगळे वेगळे गाव एकदा पहायलाच हवे. अभ्यासकांसाठी हा परिसर आव्हानात्मक असून यावर संशोधन लेखन झाले पाहिजे. आजही या गावात विविध उपक्रम गावकरी एकत्र येवून साजरे करतात. खुल्लोड हे गाव गावपण जपणारं , नव बदलांना सामोरे जाणारे एक भारतीय खेडे आहे.


**प्रा. डॉ. शिवाजी हुसे**

**कन्नड**

**मो. ९४०४०००३९८**


# स्वीडनमधील शिक्षण १५ वर्षांनंतर 'डिजिटल'कडून पुन्हा पाठ्यपुस्तकांकडे !

**स्वीड**नने २००९ साली एक क्रांतिकारी निर्णय घेतला. शाळांमधील पारंपरिक पाठ्यपुस्तके बाद करून त्यांच्या जागी डिजिटल स्क्रीन आणि टॅबलेट आणले. "भविष्यातील शिक्षण" असे बिरुद मिरवत हे धोरण संपूर्ण देशभर राबवण्यात आले. युरोपातील सर्वात प्रगतशील, तंत्रज्ञानस्नेही देश म्हणून जगाने स्वीडनच्या या पाऊलाचे कौतुक केले. शाळा 'स्मार्ट' झाल्या, वर्गखोल्या 'डिजिटल' झाल्या, पण १५ वर्षानंतर हाच देश आता तब्बल १२० दशलक्ष डॉलर्स म्हणजे सुमारे एक हजार कोटी रुपये खर्च करून पुन्हा छापील पाठ्यपुस्तके शाळांत आणत आहे. हा केवळ धोरणबदल नाही, हा एका मोठ्या चुकीचा जाहीर कबुलीजबाब आहे.१५ वर्षांच्या या 'डिजिटल प्रयोगा'चे निकाल धक्कादायक निघाले. स्वीडनमधील विद्यार्थ्यांचे वाचन आकलन, लेखन कौशल्य आणि गणित या तिन्ही आघाड्यांवर गुण घसरले. आंतरराष्ट्रीय पीआयएसए चाचणीत स्वीडनची कामगिरी सातत्याने खाली आली. संशोधकांनी हे सिद्ध केले की, स्क्रीनवर वाचताना मेंदू 'स्कॅनिंग मोड'मध्ये जातो, खोलवर समजून घेण्याऐवजी वरवर झटपट माहिती घेण्याकडे कल वाढतो. कागदावर वाचताना होणारी एकाग्रता, शब्दांशी होणारा संवाद आणि स्मरणशक्तीवर होणारा सकारात्मक परिणाम हे सगळे स्क्रीनने हिरावून घेतले होते. शिवाय, सतत स्क्रीनसमोर बसल्याने मुलांच्या झोपेवर, डोळ्यांवर आणि मानसिक एकाग्रतेवरही विपरीत परिणाम झाल्याचे अभ्यास समोर आले.शाळांमधील बनल्या शिक्षणाऐवजी मनोरंजनाचा अड्डास्वीडनच्या शिक्षण मंत्रालयाने नंतर स्वतःच कबूल केले की, "तंत्रज्ञान हे साधन आहे, उद्दिष्ट नाही" हे मूलभूत तत्त्व विसरले गेले. सरकारने केवळ स्क्रीन आणले, पण शिक्षकांना प्रशिक्षण नाही, अभ्यासक्रमाशी सुसंगत डिजिटल सामग्री नाही आणि मुलांनी वर्गात स्क्रीन कशी वापरावी, याचे नियम नाहीत. परिणामी मुले युट्यूब, गेम्स आणि सोशल मीडियाकडे वळली, शिक्षक हतबल राहिले. शाळांमधील 'फ्री स्क्रीन टाइम' हा शिक्षणाऐवजी मनोरंजनाचा अड्डा बनला. मुलांना माहितीचा महापूर दिला, पण ज्ञान हिरावले. स्वीडनची शिक्षणतज्ज्ञ इन्ग्रिड गुस्ताफसन यांनी नमूद केले की, डिजिटलायझेशनने मुलांना माहितीचा महापूर दिला, पण ज्ञान मात्र हिरावले. आता स्वीडन पुन्हा पाठ्यपुस्तकांकडे वळत आहे, पण हा निर्णय केवळ 'जुन्याकडे परत' असा साधा नाही. स्वीडनने यातून एक महत्त्वाचा धडा शिकला आहे : वय, विषय आणि उद्दिष्टानुसार डिजिटल व पारंपरिक शिक्षणाचा समतोल साधणे हेच खरे शहाणपण! प्राथमिक शाळांत पुस्तके, हस्तलेखन आणि वाचन यांना पुन्हा केंद्रस्थानी आणले जात आहे. *डिजिटल साधने पूर्णतः बाद होत नाहीत, पण ती आता 'पूरक' म्हणून वापरली जातील, 'पर्याय' म्हणून नाही. $१२० दशलक्षची ही गुंतवणूक म्हणजे एका मोठ्या चुकीची किमत मोजणे आहे.राज्याने, देशाने स्वीडनच्या चुकीतून धडा घ्यावाभारतासाठी आणि विशेषतः महाराष्ट्रासाठी स्वीडनचा हा अनुभव अत्यंत बोलका आहे. आपल्याकडेही 'डिजिटल शाळा', 'ई-लर्निंग', 'टॅबलेट योजना' यांची घोषणा करताना स्वीडनची चूक डोळ्यासमोर ठेवणे गरजेचे आहे. तंत्रज्ञान आणले म्हणजे शिक्षण सुधारले, असे समीकरण नाही. जिल्हा परिषदेच्या शाळांतील मुले अजूनही पाठ्यपुस्तकांवरच मोठी होत आहेत आणि जगातील सर्वात श्रीमंत देशांपैकी एक असलेला स्वीडन आज त्याच वाटेवर परतत आहे, हे अत्यंत विचार करायला लावणारे आहे.




**प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे.**

(जे ई एस महाविद्यालय जालना.)

मराठी विषयाचे प्राध्यापक, समीक्षक, व शिक्षण तज्ञ आहेत.